www. pratahkal.com
प्रातःकाल

महाराष्ट्राला जागतिक गुंतवणुकीचे केंद्र बनविण्याचा संकल्प - मुख्यमंत्री

मुंबई, दि. ३ (प्रतिनिधी): महाराष्ट्र हे जागतिक गुंतवणुकदारांसाठी सर्वात आकर्षक 'डेस्टिनेशन' बनविण्याचा शासनाचा संकल्प आहे. भारतीय विदेश सेवेतील सेवा अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या सूचनांचा विचार करून राज्य शासन विविध क्षेत्रातील बाबींसाठी नवी धोरणे आखेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षा निवासस्थानी भारतीय विदेश सेवेतील अधिकाऱ्यांसोबत संवाद साधला. यावेळी त्यांनी महाराष्ट्रातील वेगाने बदलणाऱ्या पायाभूत सुविधा, गुंतवणूक संधी आणि राज्याच्या जागतिक स्तरावरील प्रगतीविषयी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्रात १० लाख कोटी रुपयांचे पायाभूत प्रकल्प सुरू आहेत. यात महामार्ग, बंदरे, विमानतळ, वीज प्रकल्प, शहरी विकास आणि पाणीपुरवठा यांचा समावेश आहे. वाढवण बंदर व समृद्धी महामार्ग यामुळे महाराष्ट्र जागतिक पुरवठा साखळीत क्रांतिकारी बदल घडवणार आहे. 'जेएनपीटी' बंदराची क्षमता संपत आल्याने वाढवण बंदर देशासाठी मोठा पर्याय ठरणार आहे. समृद्धी महामार्गाद्वारे राज्यातील २६ जिल्हे या बंदराशी जोडले जातील, ज्यामुळे लॉजिस्टिक्स खर्च मोठ्या प्रमाणात

कमी होण्यास मदत होणार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, वाढवण येथील परिसरात देशातील पहिले मल्टी-मोडल हब उभे राहणार आहे. येथे पोर्ट, एअरपोर्ट, बुलेट ट्रेन आणि महामार्गाचे संपूर्ण जाळे उपलब्ध असेल. या भागात चौथी मुंबई तयार होत आहे. त्याचबरोबर नवी मुंबईत युनिव्हर्सिटी टाउनशिप, स्पोर्ट्स सिटी, मेडिसिटी आणि इनोव्हेशन सिटी विकसित करण्यात येत आहेत.

औद्योगिक गुंतवणुकीबाबत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्रात देशातील ३०% उत्पादन होते. आता पुणे, नागपूर, विदर्भ आणि मराठवाड्यात नवी औद्योगिक केंद्रे उभारत असल्याने राज्य संपूर्णपणे औद्योगिक नकाशावर अग्रगण्य ठरेल. नागपूरमध्ये डिफेन्स मॅन्युफॅक्चरिंग आणि सोलर हब, तर विदर्भात गडचिरोली येथे स्टील हब उभे राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणाऱ्या भारतीय विदेश सेवेतील योजना पटेल (डीपीआर, पीएमआय न्यूयॉर्क), प्रतिभा पारकर-राजाराम, संयुक्त सचिव (संसद व समन्वय), परमिता त्रिपाठी, संयुक्त सचिव (ओशेनिया व आयपी), अंकन बॅनर्जी, संयुक्त सचिव (डीई), स्मिता पंत, राजदूत, एल सॅल्वाडोर, बिष्वदीप डे, उच्चायुक्त, टांझानिया आणि सी. सुगंध राजाराम, संयुक्त सचिव (बिम्सटेक व सार्क) यांचा समावेश होता.

मराठा आंदोलनाच्या सांगतेनंतर रात्रीपासून पहाटेपर्यंत स्पेशल क्लिनींग

मुंबई, दि. ३ (प्रतिनिधी): मुंबई मध्ये सुरु असलेल्या मराठा आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आंदोलक मोठया संख्येने नवी मुंबईमध्ये सिडको एक्झिबिशन सेंटर व इतर ठिकाणी थांबलेले होते. काल २ सप्टेंबर रोजी आंदोलनाची सांगता झाल्यानंतर हे नागरिक आपापल्या गावांकडे परतले. राज्याच्या इतर भागांतून एकाच वेळी इतक्या मोठया संख्येने नागरिक नवी मुंबईमध्ये आल्याने शहर स्वच्छतेकडे विशेष लक्ष देण्याचे निर्देश आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी दिले होते. त्या अनुषंगाने दैनंदिन स्वच्छता कार्यात या भागात विशेष स्वच्छता पथके तैनात करण्यात आली होती.

ड्राईव्ह राबवून सिडको एक्झिबिशन सेंटर व परिसराची सखोल स्वच्छता – नागरिकांकडून प्रशंसा

त्याचप्रमाणे आंदोलनाची सांगता झाल्यानंतर आयुक्तांच्या निर्देशानुसार, अतिरिक्त आयुक्त श्री. सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली, घनकचरा व्यवस्थापन विभाग उपआयुक्त डॉ. अजय गडदे यांच्या माध्यमातून २ सप्टेंबर रोजी रात्रीपासून पहाटे ४ वाजेपर्यंत या भागात स्पेशल क्लिनींग ड्राईव्ह राबविण्यात आला. यामध्ये प्रामुख्याने सिडको एक्झिबिशन सेंटर व त्याचा परिसर तसेच से. ३० वाशी आणि तुंगा हॉटेल आसपासचा परिसर आणि सायन पनवेल हायवे परिसर याठिकाणी सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

या मोहीमेत १०० हून अधिक स्वच्छताकर्मी, स्वच्छता अधिकारी व स्वच्छता निरीक्षक तसेच २ यांत्रिकी सफाई मशीन, ३ सिव्हरेज जेटिंग मशीन तसेच कचरा संकलन व वाहतूक करणारी वाहने यांच्या माध्यमातून २१ टन इतक्या मोठया संख्येने कचरा संकलीत करण्यात आला व तुर्भे येथील प्रकल्पस्थळी वाहून नेण्यात आला.

आंदोलन संपल्यानंतर तत्परतेने रात्रीच ही विशेष मोहीम हाती घेउन पहाटे ४ पर्यंत अथक काम करुन दुस-या दिवसाचा सूर्य उगविण्यापूर्वीच हा संपूर्ण परिसर नेहमीसारखा स्वच्छ केल्याने त्या परिसरात मॉर्निंग वॉकला तसेच कामासाठी जाणा-या नागरिकांकडून महानगरपालिकेच्या तत्पर स्वच्छता कार्याची प्रशंसा करण्यात आली.

महावितरणचे अध्यक्ष लोकेश चंद्र यांना 'एनर्जी लीडरशिप ॲवॉर्ड'

मुंबई, दि. ३ (प्रतिनिधी): महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. लोकेश चंद्र यांना इंग्लंडच्या 'वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स'तर्फे ऊर्जा क्षेत्रातील भरीव कामगिरीबद्दल नुकताच 'एनर्जी लीडरशिप ॲवॉर्ड २०२५' प्रदान करण्यात आला.

मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्याच्या ऊर्जा क्षेत्रात परिवर्तन चालू असून त्यांच्या नेतृत्वाखाली केलेल्या कामामुळे हा सन्मान झाला आहे. महावितरणच्या कामगिरीत राज्याच्या ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर व अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. या पुरस्काराचे श्रेय महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना आहे, असे मा. लोकेश चंद्र यांनी सांगितले.

वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्सचे प्रमुख पाब्लो स्टॅन्ले व अध्यक्ष हेन्री आर. यांच्या स्वाक्षरीने मा. लोकेश चंद्र यांना पुरस्कारस्वरूप प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. 'वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स' ही इंग्लंडमधील जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त संस्था आहे.

प्रशस्तीपत्रात म्हटले आहे की, ऊर्जा क्षेत्रातील असामान्य नेतृत्व, प्रशासनातील दूरदृष्टी आणि महाराष्ट्राच्या वीजवितरण क्षेत्रातील असामान्य योगदानाबद्दल मा. लोकेश चंद्र यांना एनर्जी लीडरशीप ॲवॉर्ड २०२५ प्रदान करण्यात येत आहे. कार्यक्षमता, कल्पकता आणि सेवेबद्दलच्या समर्पित वृत्तीमुळे मा. लोकेश चंद्र यांनी अक्षय्य ऊर्जेच्या वापराला चालना देण्यासोबतच लाखो नागरिकांना भरवाशाचा वीज पुरवठा करण्यात प्रमुख भूमिका बजावली आहे.

अक्षय्य ऊर्जेचा वापर करून वीजखरेदी खर्चात मोठी बचत करून वीजदरात कपात करण्याची ऐतिहासिक कामगिरी महावितरणने केली आहे. अशा प्रकारे वीजदरात कपात करणारी महावितरण ही देशातील पहिलीच सार्वजनिक वीज वितरण कंपनी आहे. पुढील पाच वर्षात वीज खरेदीमध्ये अक्षय्य ऊर्जेवर भर दिल्यामुळे महावितरणची सुमारे ६६ हजार कोटी रुपयांची बचत होणार असल्याने पाच वर्षे वीजदरात कपात शक्य झाली आहे.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठीच्या जगातील सर्वात मोठ्या विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पाच्या अंमलबजावणीत मा. लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात महावितरणने महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. राज्यात ठिकठिकाणी सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारून त्यावर ४५ लाख कृषी पंप चालविण्याची ही १६,००० मेगावॅट क्षमतेची गेम चेंजर योजना आहे.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना या घरगुती ग्राहकांना मोफत वीज मिळवून देणाऱ्या छतावरील सौर ऊर्जा निर्मिती योजनेमध्ये राज्यातील ग्राहकांनी नुकताच एक हजार मेगावॅटचा टप्पा ओलांडला. महाराष्ट्रात या योजनेची अंमलबजावणी महावितरण करत आहे.

शेतकऱ्यांना हक्काची सिंचन व्यवस्था मिळण्यासाठी शेतात सौर कृषी पंप बसविण्यामध्ये महाराष्ट्राने देशात प्रथम क्रमांक मिळविला आहे. मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेच्या अंमलबजावणीत महावितरणने देशात सर्वाधिक पंप बसविले आहेत.

'मिलाप' प्रणालीचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

मुंबई, दि. ३ (प्रतिनिधी): व्यवसाय सुलभतेच्या उद्देशाने एमआयडीसी इंडस्ट्रीयल लॅंड ॲप्लीकेशन अँड अलॉटमेंट पोर्टल (MILAAP) या संगणकीय प्रणालीचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रणालीचा उपयोग औद्योगिक, व्यावसायिक आणि निवासी भूखंडांचे वाटप करण्यासाठी होणार आहे.

आर्थिक वाढीला चालना देऊन गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी एमआयडीसीचा नवोपक्रम आहे. याद्वारे उपलब्ध भूखंडांची यादी, सहज-सोपी प्रक्रिया, ऑनलाईन पेमेंट, स्वयंचलित, पारदर्शक आणि तात्काळ मंजुरीसह प्रक्रिया प्रदान करते. गुंतवणूकदारांना आवश्यक धोरणात्मक क्षेत्रांना प्राधान्य यासह मिलाप ही प्रणाली व्यवसाय सुलभतेचा समर्पक आहे. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योगमंत्री उदय सामंत, सचिव (उद्योग) पी अनबलगन, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी वेलरासू व एमआयडीसीचे सह मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विजय राठोड उपस्थित होते.

सातव्या दिवशी ७१ टक्के मूर्तींचे विसर्जन महानगरपालिकेच्या कृत्रिम तलावांत

वसई, दि. ३ (वार्ताहर): पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करणेच्या महानगरपालिकेच्या आवाहनाला चांगला प्रतिसाद देत मंगळवार दि.०२ सप्टेंबर रोजी सातव्या दिवशीच्या विसर्जनावेळीही नागरिकांनी महानगरपालिकेने उभारलेल्या कृत्रिम तलावांत मोठ्या संख्येने गौरी-गणपतींच्या मूर्तीचे विसर्जन केले. मूर्ती विसर्जनासाठी महानगरपालिकेने तयार केलेल्या कृत्रिम तलावांना नागरिकांचा

चांगला प्रतिसाद मिळत आहे. मंगळवारी सातव्या दिवशीच्या विसर्जनात ७३९० घरगुती व ४६५ सार्वजनिक अशा एकूण ७८५५ गौरी-गणपतींच्या मूर्तींचे विसर्जन झाले. त्यापैकी ५२७७ घरगुती व ३३८ सार्वजनिक अशा एकूण ५६१५ गणेशमूर्तींचे विसर्जन हे पालिकेच्या कृत्रिम तलावात करण्यात आले; एकूण ७१% मूर्तींचे विसर्जन हे पालिकेच्या कृत्रिम तलावांत करण्यात आले.

महानगरपालिकेमार्फत यावर्षी मूर्ती विसर्जनासाठी एकूण ११६ कृत्रिम तलाव तयार करण्यात आले असून सहा जेट्टींच्या ठिकाणी व दोन बंद दगडखाणींच्या ठिकाणीही विसर्जनाची सोय करण्यात आली आहे. प्रत्येक प्रभागात २ फिरते हौद याप्रमाणे मूर्ती विसर्जनासाठी ९ प्रभागांमध्ये १८ फिरते हौद उपलब्ध करण्यात आले आहेत. आयुक्त मनोज कुमार सूर्यवंशी तसेच लोकप्रतिनिधी यांनी पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करणे बाबत आवाहन करून वसई विरार शहर महानगरपालिकेतील नागरिकांना पर्यावरणपूरक गणेशोत्सव राबविण्यासाठी प्रेरित केले. याचाच परिणाम म्हणून दीड दिवस, पाच दिवस व सातव्या दिवशीच्या विसर्जनावेळी कृत्रिम तलावातील मूर्ती विसर्जनाचे प्रमाण वाढले आहे.

केमटेक इंडस्ट्रियल वाल्व्हस लिमिटेड
नोंदणीकार्यालय :- ५०३, सनराईज बिझनेस पार्क, प्लॉट नं. बी-६८, रोड नंबर १६
किसन नगर - २ जवळ, वागळे इंडस्ट्रियल इस्टेट, ठाणे- ४००६०४, महाराष्ट्र, भारत.
सी.आय.एन. एल २९२९९एमएच १९९७ पीएलसी१०५१०८
Website: http://www.chemtechvalves.com
Email: investors@chemtechvalves.com
२९वी वार्षिक सर्वसाधारण सभाची सूचना

१. याद्वारे कळविण्यात येत आहे की कंपनीची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) मंगळवार दि., ३० सप्टेंबर, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता व्हिडिओ कॉन्फरन्सिंग / इतर ऑडिओ व्हिज्युल मन्स द्वारा आयोजित केली आहे वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनामध्ये कामकाज ठरवल्याप्रमाणे.
२. सामान्य पत्रिका क्रमांक २०/२०२० दिनांकी ०५.०५.२०२०, सामान्य पत्रिका क्रमांक ०२/२०२१ दिनांकी १३.०१.२०२१, सामान्य पत्रिका क्रमांक १९/२०२१ दिनांकी ०८.१२.२०२१, सामान्य पत्रिका क्रमांक २१/२०२१ दिनांकी १४.१२.२०२१, सामान्य पत्रिका क्रमांक ०२/२०२२ दिनांकी ०५.०५.२०२२ कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय ("एम सी ए ") यांनी जारी केली आहे आणि पत्रिका क्रमांक SEBI/HO/CFD/CMD1 / CIR/P/2020/79 दिनांकी मे १२, २०२०, पत्रिका क्रमांक SEBI/HO/CFD/CMD2 / CIR/P/2021/11 दिनांकी जानेवरी १५, २०२१ आणि SEBI/HO/CFD/CMD2/CIR/P/2022/62 दिनांकी मे १३, २०२२ सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया ("सेबी") यांनी जारी केली आहे (यापुढे सर्वांचा एकत्रित उल्लेख "परीपत्रके" असा करण्यात येणार आहे) त्यांना अनुसरुन कंपनीची वार्षिक सर्वसाधारण सभा २०२४- २५ या आर्थिक वर्षासाठी आयोजीत करण्यात आली आहे. वार्षिक सर्वसाधारण सभाची सूचना सोबत वार्षिक अहवाल इत्यादी इलेक्ट्रॉनिक माध्यमा द्वारे कंपनीच्या सभासदाना पाठविण्यात आला आहे ज्यांचा ई-मेल कंपनी / डीपोसिटरि पार्टीसिपंट यासोबत उपलब्ध आहे.
३. वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) ची सूचना आणि वार्षिक अहवाल कंपनीच्या http://www.chemtechvalves.com या संकेतस्थळावर, बी एस ई लिमिटेडच्या http://www.bseindia.com या संकेतस्थळावर तसेच बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडच्या (आर टी ए) https://ivote.bigshareonline.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
४. कंपनीने बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड (आर टी ए) यांना २३ सप्टेंबर २०२५ या ठरवलेल्या दिवशीच्या सदस्यांसाठी रिमोट ई-व्होटिंगद्वारे मतदानाची सुविधा प्रदान करण्यासाठी नियुक्त केले आहे.
५. कंपनी कायदा २०१३ कलम १०८ मधील आवश्यक त्या तरतुदी, तसेच त्यासह वाचा कंपॅनिए (मानजमेंट अँड ऍडमिनिस्ट्रेशन) नियम, २०१४ चा नियम, सेबी लिस्टिंग ऑब्लिगेशन ऍड डिस्क्लोजर रिक्वाइर्मन्ट) रेगुलेशन, २०१५ ("लिस्टिंग रेगुलेशन) चा नियम ४४ यांना अनुसरुन :
ए) २९वी वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना मध्ये नमूद केलेल्या विषयांवर सभासदांना इलेक्ट्रॉनिक मतदान पद्धतीने मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी आपल्या सभासदांना दूरस्थ ई-मतदान सुविधा उपलब्ध करून देत आहे.
बी) कट-ऑफ तारीख : मंगळवार, २३ सप्टेंबर २०२५.
सी) दूरस्थ ई मतदान सुरु होण्याचा दिवस, तारीख आणि वेळ : शनिवार, २७ सप्टेंबर, २०२५ सकाळी ०९:०० वाजता
डी) दूरस्थ ई मतदान समाप्त होण्याचा दिवस, तारीख आणि वेळ : सोमवार, २९ सप्टेंबर, २०२५ संध्याकाळी ०५:०० वाजता
ई) वार्षिक. सर्वसाधारण सभा निग्रामीत करण्याची प्रकिया पूर्ण झाल्यानंतर एखादी व्यक्ती कंपनीचे समभाग घेऊन कंपनीची सभासद झालेली असेल आणि कट ऑफ तारीख म्हणजेच मंगळवार, २३ सप्टेंबर २०२५ रोजी त्याच्याकडे कंपनीचे समभाग असतील तर त्या व्यक्तीने वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेत नमूद केलेल्या ई मतदान सूचनांचा अनुसार करावा.
एफ) सभासद ज्यांच्याकडे डिमॅट स्वरुपात किंवा प्रत्यक्ष स्वरुपात कंपनीचे सहभाग आहेत आणि ज्यांनी आपले ई-मेल कंपनी / बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड (आर टी ए) / डीपोसिटरि पार्टीसिपंट ह्यांचा कडे नोंदणी केले नाही त्यांना विनंती केली जात आहे की कृपया त्यांनी आपले ई-मेल नोंदणी करून घ्यावे.
६. सभासदांना विनंती करण्यात येते की त्यांनी खालील बाबीची नोंद घ्यावी.
• सोमवार, २९ सप्टेंबर, २०२५, संध्याकाळी ०५:०० वाजता नंतर दूरस्थ ई मतदान प्रारूप बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड (आरटीए) ह्यांचा काढून मतदानासाठी बंद करण्यात येईल.
•ज्या सभासदांकडे कंपनीचे सहभाग मंगळवार, २३ सप्टेंबर २०२५ रोजी प्रत्यक्ष स्वरुपात किव्हा डिमॅट स्वरूपात उपलब्ध असतील असे सभासद मतदानासाठी पात्र असतील.
७. कंपनी कायदा २०१३ कलम ९१ मध्ये आवश्यकत त्या तरतुदी तसेच त्यासह वाचा त्या अंतर्गत बनविण्यात आलेले विविध नियम यांना अनुसरुन तसेच लिस्टिंग रेगुलेशन ४२ यांचा अनुसरुन कंपनीच्या सभासद नोंद पुस्तिका आणि सहभाग हस्तांतरण पुस्तिका वार्षिक सर्वसाधारण सभेच्या उद्देशाने मंगळवार, २३ सप्टेंबर २०२५ ते सोमवार, २९ सप्टेंबर, २०२५ या कालावधीत (दोनी दिवस धरून) बंद राहील.
८. मतदान प्रकिया योग्य आणि पारदर्शक पद्धतीने व्हावी यासाठी छाननी अधिकारी म्हणून मेसर्स एस. पी. इमारते अँड असससोसिएट्स, कंपनी सेक्रेटरी यांची नियुक्ती केली आहे.
९. दूरस्थ ई मतदान / वार्षिक सर्वसाधारण सभे दरम्यान मतदान यांचे निकाल वार्षिक सर्वसाधारण सभा संपल्यानंतर कामकाजाच्या दोन दिवसात करण्यात येतील. जाहीर केलेले निकाल छाननी अधिकाऱ्याचा अहवालासह कंपनी वेबसाईट, येथे प्रसिद्ध करण्यात येईल आणि ज्या भांडवली बाजारात कंपनीचे समभाग नोंदणीकृत आहेत अशा भांडवली बाजारांना त्याची माहिती देण्यात येईल.
१०. वार्षिक सर्वसाधारण सभेची कोणत्याही स्वरुपाची शंका असल्यास किव्हा दूरस्थ ई-मतदान यांचा बाबतीत कोणत्याही स्वरुपाची शंका असल्यास सभासद या investors@chemtechvalves.com ई-मेल वर संपर्क करू शकतात.

कैमटेक इंडस्ट्रियल वाल्व्ह लिमिटेड
स्वाक्षरी/-
हर्ष बडकुर
व्यवस्थापकीय संचालक
डी. आय. न: ००६७६७१५
जागा :- ठाणे
दिनांक :- ०३ सप्टेंबर, २०२५.

सार्वजनिक सूचना

माझ्या वतीने सार्वजनिक सूचना जारी केली जात आहे की, क्लायंट **श्री. प्रवीण कुमार पुरोहित** (यापुढे **माझे क्लायंट** म्हणून संदर्भित) कोण आहे हे खोलीच्या जागेची विक्री करणे बेअरिंग नाही खोली क्र.२, जय हिंद सोसायटी, शिवाजी नगर,साकी विहार रोड, पवई, मुंबई – ४०००७२ (यापुढे **सदर रूम म्हणून** संदर्भित). माझे क्लायंट म्हणत आहेत की, श्री. जगदीशचंद्र गुप्ता, मूळसदर खोलीच्या मालकाने विकले जे श्री. राजेंद्र कृष्णा यांना खोलीची जागा दिली. तथापि, बोलईकर यांनी सांगितलेल्या विक्री करारात हरवले आहे. विक्री करार द्वारे अंमलात आणला गेला आहेराजेंद्र कृष्ण बोलईकर यांच्या बाजूनेश्री जितेंद्र आर. पाल देखील हरवले आहेत आणि विक्री श्री विजय डी. डागली यांनी २००८ मध्ये करार केला. श्रीमती पुतील बन्सी डे यांची मर्जीही गेली.
कोणतीही व्यक्ती किंवा त्या व्यक्तींचा कायदेशीर वारसअसलेल्या साखळी करारात नमूद केले आहेवर उल्लेख केलेल्या संदर्भात कोणताही दावाखोलीचा परिसर किंवा त्याचा कोणताही भागविक्री, देवाणघेवाण, गहाणखत, शुल्क, भेटवस्तू,देखभाल, वारसा, ताबा, भाडेपट्टा,भाडेपट्टा, धारणाधिकार, परवाना, गहाणखत, हस्तांतरणकोणत्याही ट्रस्ट अंतर्गत मालकी हक्क किंवा फायदेशीर हितसंबंध, प्रिस्क्रिप्शन किंवा प्री-एम्प्शन किंवा त्याखालील अधिकारकोणताही करार किंवा इतर व्यवस्था किंवा अंतर्गतकोणताही हुकूम, आदेश किंवा निवाडा किंवा अन्यथायाद्वारे विनंती केली जात असल्याचा दावा करणेतेच एकत्र लिहून कळवणेखाली स्वाक्षरी करणाऱ्यांना सहाय्यक कागदपत्रांसह १४ दिवसांच्या आत त्याच्या कार्यालयात (दोन्ही दिवस समाविष्ट) येथे जे न केल्यास अशा व्यक्तींचे दावे मानले जातीलमाफ केले गेले आहे आणि/किंवा सोडून दिले आहे.
ठिकाण : मुंबई दिनांक : ०४.०९.२०२५
घनश्याम यादव
(उच्च न्यायालयाचे वकील)
कार्यालय : तिसरा मजला, अंधेरी कोर्ट बार असोसिएशन,अंधेरी पूर्व, मुंबई-४०००६९

PUBLIC NOTICE

By this Notice, Public in general is informed that **late Mr. Simon Saldanha,** member of the Pushpakant Shantinagar Co-operative Housing Society Ltd., original owner of Flat No. C-41/202, Sector-2, Shanti Nagar, Mira Road (East), Dist. Thane-401107, died intestate on **22/12/2004** and after his death the shares and interest in the capital / property of the society transferred in name of the wife of the deceased, Mrs. Agnes Simon Saldanha by the society and Mrs. Agnes Simon Saldanha also died on **24/05/2024,** Mrs. Jacintha Mathias is claiming transfer of shares and interest in the capital / property of the society belonging to the deceased in her name being daughter and one of the legal heir and successor of the deceased. Mrs. Sylvestrine Coutinho, the another legal heir of the deceased has decided to release her share from the said flat in favour of Mrs. Jacintha Mathias by executing a registered Release Deed. Claims and objections are hereby invited from the other legal heirs and successors of the deceased if any for transfer of shares and interest belonging to the deceased as well as the execution of the release deed in respect of the said Flat. The claimants / objectors may inform to undersigned within period of **15 days** from the publication of this notice failing which the Release Deed will be executed and registered, the society will transfer shares and interest belonging to the deceased in the name Mrs. Jacintha Mathias and thereafter any claim or objection will not be considered.
Sd/-
K. R. TIWARI (ADVOCATE)
Shop No. 14, A - 5, Sector - 7, Shantinagar, Mira Road, Dist. Thane - 401107.

नावात बदल

एम-२४९३३४८ क्रमांकाच्या महाराष्ट्र सरकारच्या गझेटनुसार मी माझे नाव समायरा ओबेरॉय वरून समायरा घोष ओबेरॉय असे बदलले आहे.

PUBLIC NOTICE

This is to inform to the general public at large that the **Original Share Certificate Distinctive No. 761 To 770** (10 Shares) in the name of **Mr. Parvez Ahmed Khalkullah Choudhary** of Flat No. C/410, C Wing, 4th Floor, IVY Homes, CTS 750, Others Village Ward, Kurla (West), Mumbai - 400070 has been **Lost / Misplaced**. Complaint is lodge with **Vinoba Bhave Nagar Police Station** on 03/09/2025, **Lost Report No. 114823/2025.**
If anybody found may please contact **Vinoba Bhave Nagar Police Station / Society's Office** Or inform **Mr. Parvez Ahmed Khalkullah Choudhary** on **Mobile - 9372364829** within **14 days** of publication of this notice.
Place : Mumbai Date : 04/09/2025

निरज सिमेंट स्ट्रक्चर्स लिमिटेड
सीआयएन : L26940MH1998PLC114307
नोंदणीकृत कार्यालय : निरज हाऊस, सुंदर बाग, देवनार बस डेपोजवळ, चेंबूर (पूर्व), मुंबई -४०००८८
दूरध्वनी : +९१ २२ ६६०२७१००, ई-मेल : cs@niraj.co.in वेबसाइट : www.niraj.co.in
व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी)/इतर ऑडिओ व्हिज्युअल मीन (ओएव्हीएम) द्वारे आयोजित करण्यात येणाऱ्या कंपनीच्या सत्तावीसव्या (२७व्या) वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

याद्वारे **सूचना** देण्यात येत आहे की, मे. निरज सिमेंट स्ट्रक्चर्स लिमिटेड (कंपनी) च्या सदस्यांची सत्तावीसवी (२७) वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) **सोमवार, २९ सप्टेंबर, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता (भाप्रवे)** व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी)/इतर ऑडिओ व्हिज्युअल मीन्स (ओएव्हीएम) द्वारे आयोजित केले जाईल, कंपनी कायदा आणि एक्सचेंज बोर्ड ०१ अंतर्गत लागू असलेल्या तरतुदींचे पालन करून आणि एक्सचेंज बोर्ड २०१३ नुसार कंपनी व्यवहार मंत्रालय (एमसीए) आणि सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) यांनी जारी केलेल्या विषयावरील सर्व लागू परिपत्रकांसह भारताचे (सूचीबद्ध दायित्व आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनियम, २०१५ वाचले अनुसार आयोजित केली होती.
सदस्य केवळ व्हीसी/ओएव्हीएम द्वारे एजीएममध्ये उपस्थित राहू आणि सहभागी होऊ शकतील. व्हीसी/ओएव्हीएम द्वारे एजीएमला उपस्थित राहणाऱ्या सदस्यांची गणना अधिनियमाच्या कलम १०३ अंतर्गत कोरम मोजण्याच्या उद्देशाने केली जाईल. एमसीए आणि सेबीने विषयावर जारी केलेल्या लागू परिपत्रकांचे पालन करून, २७ वी एजीएमची एमसीए आणि सेबी २०२४-२५ साठी वार्षिक अहवालाची सूचना केवळ इलेक्ट्रॉनिक मोडद्वारे सर्व सदस्यांना पाठविली जाईल ज्यांचे ईमेल पत्ते डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स/रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट/कंपनीकडे नोंदणीकृत आहेत. त्यांच्या डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स (डीपी) सह त्यांचे ईमेल पत्ते ने विहित केलेल्या प्रक्रियेचे अनुसरण करून.
कंपनीने नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) च्या सर्व सदस्यांना रिमोट ई-व्होटिंग सुविधा (रिमोट ई-व्होटिंग) प्रदान करण्यासाठी २७ एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या सर्व ठरावांवर त्यांचे मत देण्यासाठी सेवा गुंतलेली आहे. याव्यतिरिक्त, कंपनी, मार्फत, एजीएम (ई-व्होटिंग) दरम्यान ई-मतदान प्रणालीद्वारे मतदान करण्याची सुविधा प्रदान करत आहे.
तपशील खालीलप्रमाणे (१) ईमेल पत्ते नोंदणी/अपडेट करण्याची पद्धत, (२) रिमोट ई-व्होटिंग/ई-व्होटिंगद्वारे मत देणे आणि (३) / द्वारे एजीएममध्ये उपस्थित राहणे यासारखे तपशील एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केले आहेत जे योग्य वेळी पाठवले जातील.
सदस्यांना विनंती आहे की, २७ व्या एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या सर्व नोट्स (इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठवल्या जात आहेत) आणि विशेषतः एजीएममध्ये सामील होण्याच्या सूचना, रिमोट ई-व्होटिंगद्वारे किंवा एजीएममध्ये ई-व्होटिंग सुविधेद्वारे मतदान करण्याची पद्धत.
२७ वी एजीएम सूचना आणि २०२४-२५ साठी वार्षिक अहवाल देखील कंपनीच्या वेबसाइट https://www.niraj.co.in स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाइटवर, म्हणजे बीएसई लिमिटेड www.bseindia.com वर आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड www.nseindia.com वर आणि www.evoting.nsdl.com कॉमच्या वेबसाइटवर देखील उपलब्ध करून दिला जाईल.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
निरज सिमेंट स्ट्रक्चरल्स लिमिटेड साठी
सही/-
कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी
सदस्यत्व क्रमांक - ए६६०६३
तारीख : ३ सप्टेंबर २०२५
ठिकाण: मुंबई

पनवेल महानगरपालिका
फेर निविदा (2nd Call)

पनवेल महानगरपालिकेस सन २०२५-२०२६ या वित्तिय वर्षाकरीता निविदापत्रकांत नमूद केलेनुसार, पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील प्रगतीशील पनवेल शॉट फिल्म (लघुपट) स्पर्धाचे आयोजन करण्याकरीता पात्र व इच्छुक संस्था / नोंदणीकृत पुरवठाधारक व प्रशिक्षित असलेल्या संस्था यांच्या कडून सदर कामी निविदा मागविण्यात येत आहेत. याकामी कोरे निविदा प्रपत्र व कामाची तपशिलवार माहिती www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर दिनांक ०४/